# पर्यावरण सद्यस्थिती अहवाल २०११-१२: कचरा व्यवस्थापन

२८ ऑगस्ट २०१२

रूपाली घाटे

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(कचरा व्यवस्थापनेच्या नीलप्रतीसाठी)

# घनकचरा व्यवस्थापन

## ६.३ पर्यावरणीय घटकावरील परिणाम

## पान १२७ – कचऱ्यामुळे होणारे परिणाम

पुण्यात दररोज अंदाजे १४०० टन कचरा संकलित करून देवाची उरूळी येथे पुढील प्रोसेसिंगसाठी पाठविला जातो.

१. पुणे शहर आय.टी. हब म्हणून देखील ओळखले जाते, तरी देखील अहवालात ई-वेस्ट किती निर्माण होते याबाबत उल्लेख नाही. पुणे शहरात महाराष्ट्राच्या १०% ई-वेस्ट निर्माण होते[1].

२. १४०० टन कचरा हा रोज उरूळी देवाचीला डंप केला जातो असे अहवालात दिले आहे, तसेच पृ.क्र.१३३ वर असे दिले आहे की सन २००० नंतरच्या बांधकामांना जेथे कचरा निर्माण होतो तेथे ओला कचरा जिरविणे बंधनकारक आहे.

   पण या निवासी संकुलांमध्ये एकूण किती टन कचरा जिरविला जातो व त्याच्यामुळे या १४०० टन निर्माण होणारा कचरा जो उरूळी देवाचीला जातो तो किती टक्के कमी होतो व महापालिकेचा ताण किती कमी झाला आहे या बाबत स्पष्टीकरण द्यावे.

३. पुणे शहरात किती घंटा गाड्या आहेत व ते कुठल्या विभागात व किती मिळकतींचा कचरा उचलतात?
४. पुणे शहरात किती उघड्या कचराकुंड्या आहेत, त्यांचा हिशेब काय?
५. पान १३२ वर नमूद केले आहे की सप्टेंबर मध्ये ९०% घरांमधून कचरा उचलतात, तरी देखील अजून बऱ्याच ठिकाणी उघड्या कचराकुंड्या का आहेत? हॉटेलच्या कचऱ्याचे काय केले जाते? तसेच ईतर व्यावसयिक संकुलांमधल्या कचऱ्याचे काय केले जाते? तसेच भाजी मंडई मधल्या कचऱ्याचे काय होते उदा. महात्मा फुले मंडई, गुलटेकडी, मॉडेल कॉलोनी, बाणेर; भवानी पेठेतील टिंबर मार्केटच्या कचऱ्याचे काय होते?
६. बायोगॅस प्रकल्पांचे ठिकाण कुठे? अपारंपारिक उर्जा निर्मितीमध्ये उचललेली पावले अगदी योग्य दिशेनी आहेत. त्याबाबत लोकांमध्ये जागृती का केली जात नाही?

[1] http://articles.timesofindia.indiatimes.com/2012-05-13/pune/31689119_1_e-waste-waste-electrical-transboundary-movement

## पान १३१ – विकेंद्रित घनकचरा व्यवस्थापन

घनकचरा डंप करण्याचे ठिकाण बंदिस्त केले जाईल, म्हणजेच तिथे ‘कॅपिंग’ केले जाईल परंतु तयार होणाऱ्या लीचेट (निचरा) वर काय प्रक्रिया करणार याबाबत अहवाल काही सुचवत नाही.

कचरा जमिनीत मुरल्यामुळे उरुळी देवाचीमधील भूजल साठे दूषित होऊ लागलेत. लीचेट जमिनीत जाऊ नये यासाठी कचरा डंप केला जाणाऱ्या भूखंडावर जमिनीचा बचाव करणारे थर तयार केले पाहिजेत.

उरुळी देवाची या गावाची अवस्था दयनीय झाली आहे. ग्रामस्थांना अत्यंत घाणेरड्या वातावरणात राहावे लागत आहे, त्यांच्या मुलाबाळांना दारिद्र्य सहन करावे लागत आहे. त्यांचे आयुष्य सुधारण्यासाठी पुणे महानगरपालिकेने कोणते उपाय योजिले आहेत? मुळात उपाय योजिले आहेत की नाही? 'पर्यावरण अहवाल' या व्यवस्थेचे महत्त्व लक्षात घेत नाही.

पुणे शहरात कचरा निर्माण होतो तिथपासून विल्हेवाट लावेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ढासळलेली आहे. जिथे कचरा डंप केला जातो त्या गावाचा इस्कोट झालेला आहे. हवा आणि पाण्याचे भयंकर प्रमाणात प्रदूषण पुणे शहराने पाहिलेले आहे. त्यात सुमार कचरा व्यवस्थापनाने भर पडते आहे व सार्वजनिक आरोग्याचा बोजवारा उडाला आहे.

## संदर्भ सूची

### १. 'लिचेट'च्या नावाखाली फुरसुंगीवर करोडोंची खैरात

22 Jun 2012 (म. टा.)

नव्याने खर्च करण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव

उरळी देवाची आणि फुरसुंगी येथील कचरा डेपोतील कचऱ्यावर कॅपिंगचे काम सुरू असतानाच आता पूवीर्च्या कचऱ्यामुळे होणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करण्यासाठी एक कोटी रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला आहे. या कचरा डेपोमुळे झालेल्या प्रदुषणाचे प्रायश्चित्त म्हणून दोन्ही गावांमध्ये कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली जात आहेत. मात्र, आता नाल्यांमध्ये जाणाऱ्या लिचेटवर प्रक्रियेच्या नावाखाली या गावांवर करोडांेची खैरात होणार आहे.

या कचरा डेपोंमध्ये १९९१पासून उघड्यावर कचरा टाकण्यात येत होता. त्यामुळे लिचेट निर्माण होऊन भूगर्भातील पाणीसाठा दूषित झाला. तसेच, शेतीच्या उत्पादनावरही परिणाम झाला. त्या विरोधात या ग्रामस्थांनी २००९पासून २०११ पर्यंत आंदोलन केल्यानंतर महापालिकेने प्रायश्चित्त म्हणून गावांमध्ये विकासकामे करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कोट्यवधी रुपयांची कामे सुरू आहेत. तसेच, उघड्यावर कचरा टाकणे बंद करून जानेवारी महिन्यापासून कचऱ्यावर कॅपिंग करण्याचे काम हाती घेण्यात आले. हे काम सुरू असताना आता लिचेटवर प्रक्रिया करण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. त्यासाठी एक कोटी रुपये खर्च येणार आहे.

या प्रस्तावानुसार नाल्यात जाणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करून ते पाणी सोडण्यात येणार आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने नोटिस दिली होती. त्यानुसार हा प्रस्ताव दाखल करण्यात आल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.
http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/14325928.cms

### २. ...तर ओला कचरा उचलणे थांबवू!

18 Apr 2012 (म. टा.)
कचरा जिरविण्याचे बंद असलेले बायोगॅस प्रकल्प, बायोसॅनिटायझर आणि व्हमीर्कंपोस्ट प्रकल्प आठवड्याभरात सुरू करावेत, अन्यथा ओला कचरा उचलणे थांबविण्यात येईल, असा इशारा महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे. तसेच या सर्व मिळकतदारांवर कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

महापालिकेच्या वतीने शहरातील तीन ते चार हजार मिळकतदारांना या नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. शहरात गेल्या काही काळात कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. केंद सरकारच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी कायद्यानुसार कचरा जेथे तयार होतो, तेथेच तो जिरविणे बंधनकारक आहे. त्यानुसार २००१ नंतर अस्तित्वात आलेल्या मिळकतींना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेण्यासाठी ओला कचरा जिरविण्याचा प्रकल्प

केल्याबाबत ना हरकत दाखला घेणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे. त्यानुसार अनेक सोसायट्या, बंगले आणि सदनिकाधारकांनी ओला कचरा जिरविण्यासाठी बायोगॅस, बायोसॅनटायझर्स किंवा व्हर्मीकंपोस्ट प्रकल्प सुरू केले असून, ते प्रकल्प नियमित पूर्ण क्षमतेने सुरू असल्याचे अॅफिडेव्हिटही महापालिकेकडे सादर केले आहे.

मात्र, महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या पाहणीमध्ये असे अनेक प्रकल्प बंद असल्याचे आढळून आले आहे. हे कायद्याचे उल्लंघन असून नोटीस मिळाल्यानंतर आठ दिवसांत प्रकल्प सुरू करावा, असे या नोटिशीत म्हटल्याचे महापालिकेचे उपायुक्त सुरेश जगताप यांनी सांगितले. बंद प्रकल्प सुरू करण्यासाठी महापालिकेच्या वतीने तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मात्र, 'हे प्रकल्प सुरू केले नाहीत, तर आठवड्यानंतर अशा सोसायट्या किंवा बंगलेधारकांचा ओला कचरा महापालिकेच्या वतीने उचलण्यात येणार नाही,' असे या नोटिशीत बजाविण्यात आले आहे. त्याबरोबरच त्यांच्या विरोधात दंडात्मक आणि कायदेशीर कारवाईही करण्यात येईल, असेही यामध्ये म्हटले आहे. तसेच ओला आणि सुका कचरा वेगळा करावा, यासाठीही सुमारे दोन लाख नोटिसा पाठविण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

नियम शिथील करण्याची विधीमंडळात मागणी

शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहराच्या चारही बाजूस प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा मिळणे अवघड बनले असून, महापालिकेच्या जागांवर असे प्रकल्प उभारण्यासाठी कलेक्टरच्या जागा निवड समितीच्या मान्यतेची गरज आहे. मात्र, यातील अडसर दूर करण्यासाठी यातील काही नियम शिथिल करावेत, अशी मागणी आमदार मोहन जोशी यांनी विधान परिषदेत केली.
http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/12709421.cms

### ३. Maharashtra Pollution Control Board issues notice to PMC over garbage units

Times of India - Aug 17, 2012

PUNE: The Maharashtra Pollution Control Board (MPCB) has issued a notice to the Pune Municipal Corporation (PMC) over the "nuisance being caused due to poor maintenance and operation" of the garbage processing units and for trial runs of producing biogas in the Ramtekdi industrial area without permission.

The industrial units have repeatedly been protesting against the PMC's garbage processing units being run in the area. Spread over 150 acres near Hadapsar, the Ramtekdi industrial area comprises 87 units of engineering, food industry and liquor plants among others. The industrialists claimed that the garbage, which is dumped in an open space for vermicomposting, raises a stink and creates other health problems for workers and residents.

Meanwhile, the PMC has also started trial runs for producing biogas (syngas) at its garbage disposal plant at Ramtekdi and plans to generate over 10 MW of electricity in the next few months. The plant has been assigned to a private company on a built operate transfer (BOT) basis for a period of 25 years.

Following regular complaints by locals, MPCB officials visited the plant on June 7 and recently issued a notice to the PMC. The notice said, "We have observed that the processing plant has not obtained consent from the MPCB. The trial (processing) was started without prior intimation or consent to operate from the MPCB. You have not obtained environmental clearance for power generation, if applicable, and the house keeping (general cleanliness) is also poor."

"You are hereby informed to submit the compliance immediately. If you fail to (do) the same... appropriate action will be initiated, which may result in the closure of your unit," said Nitin R Shinde, sub-regional officer, Pune (MPCB), in the notice.

However, the PMC has asserted that with the help of modern technology, the garbage is processed without creating any nuisance for the neighbouring establishments.
"The PMC has submitted its reply to the MPCB and there is no problem in running the processing units," PMC's solid waste management officer Suresh Jagtap told TOI.

The city generates around 1,300 metric tones (MT) of waste every day, which, according to the civic body, is processed daily. About 1,000 MT is processed at the Hanjer biotech company in Urali, while the remaining is taken care of at the biogas, mechanical compost and vermicompost units across the city. At Ramtekdi, the vermicompost unit processes garbage at 15% to 20% of its total capacity, while the vermicompost plant at MIDC industrial unit in Hadapsar processes garbage at 60% to 70% of its total capacity, the local residents said.

http://articles.timesofindia.indiatimes.com/2012-08-17/pune/33248297_1_compost-and-vermicompost-units-hanjer-mpcb

## ४. Pune commercial units under civic scanner for illegal waste disposal

DNA - Aug 26, 2012

Solid waste management department of the Pune Municipal Corporation (PMC) will now monitor localities where commercial establishments are disposing of waste in public bins, instead of depositing it in hotel garbage vans. Staff would be deployed to monitor late night activities and heavy fines would be levied on defaulters.

While talking to *DNA*, Suresh Jagtap, joint commissioner of solid waste management department, PMC, said, “There are many commercial establishments, restaurants and hawkers that are illegally dumping wet and non-vegetarian garbage in the bins placed all over the city. This is causing extreme nuisance, as it leads to bad stench, besides adding to stray dog menace and health hazards. So, we have taken a decision to monitor these actions. The decision was taken last week.”

There are 160 divisions for garbage management for the 76 wards in the city, and based on the population and area of the division, it is monitored by two or three supervisors.

"There have not been many complaints about non-lifting of garbage. The only problem we are facing is illegal disposal of commercial garbage in areas such as Deccan, Camp, etc, in and around malls," he said.

With the attempts by some wards to make it a zero-garbage ward, most of the areas have removed the community bins, and no litter is seen lying in those areas.

Jagtap said, "These attempts are turning out to be gradually successful, and now we will also deploy the SWaCH staff to segregate commercial waste, thus leading to cleaner wards."

http://www.dnaindia.com/pune/report_pune-commercial-units-under-civic-scanner-for-illegal-waste-disposal_1733068

### ५. कचरा व्यवस्थापनाच्या परीक्षा : पुणेकर नापास

19 Dec 2011, महाराष्ट्र टाईम्स, चैत्राली चांदोरकर, पुणे

- केवळ १२ हजार नागरिकांनी केली कचरा जिरविण्याची व्यवस्था
- ७० टक्के सोसायट्यांचे दुर्लक्ष

आपल्या घरातील कचरा पेटीत टाकताना त्याचे वर्गीकरण करा, ओल्या आणि सुक्या कच-यासाठी स्वतंत्र पिशव्या ठेवा... महापालिकेने तीन वर्षांपूर्वी केलेले हे आवाहन तुमच्या लक्षात आहे का? कचरा बागेत जिरवणा-यांसाठी घरपट्टीत सवलतही जाहीर केली. पण प्रत्यक्षात पुणेकरांनी याकडे दुर्लक्ष केले असून केवळ बारा हजार नागरिकांनी कचरा जिरवण्याची व्यवस्था केली आहे.

उरळी देवाची येथे दोन वर्षांपूवीर् कचऱ्यासाठी झालेल्या आंदोलनानंतर महापालिकेने ओला-सुका कचरा वगीर्करणाची मोहीम राबविण्यास सुरुवात केली. यासाठी विविध माध्यमांतून जागृतीही केली. विविध सोसायट्यांना नगरसेवकांनी दोन स्वतंत्र कचरापेट्याही उपलब्ध करून दिल्या, पण या बाबतीतही नव्याच्या नवलाईप्रमाणे प्रारंभीचा काळ कौतुक झाले. आता पुन्हा सत्तर टक्के सोसायट्यांनी याकडे दुर्लक्ष केले असून कचरा वगीर्करण बंद पडले आहे. कचरा उचलण्यासाठी येणाऱ्या गाड्यांमध्ये एकत्रित कचरा न देणाऱ्यांच्या संख्येत पुन्हा वाढ झाली आहे.

याबद्दल महापालिकेचे उपायुक्त सुरेश जगताप म्हणाले, 'नागरिकांनी कचऱ्याचे वगीर्करण करावे यासाठी क्षेत्रीय कार्यालयांनी सातत्याने विविध उपक्रम राबविले होते. सोसायट्यांना मागदर्शक पत्रकेही देण्यात आली, याशिवाय घरीच कचरा जिरविणाऱ्या नागरिकांना घरपट्टीमध्ये पाच टक्के सवलत देण्यात येते आहे. मात्र पुणेकरांचा याला अत्यल्प प्रतिसाद मिळाला. पुणे शहरात केवळ ११ हजार ८५० घरांनी ही सवलत मिळविली आहे. कचरा वगीर्करणाबरोबरच कचरा जिरविण्याच्या बाबतीतही पुणेकर उदासीन आहेत.'

सध्या शहरात ९० घंटागाड्या असून हॉटेलसाठी २३ स्वतंत्र गाड्या फिरतात. हा कचरा शहरातील १२ बायोगॅस आणि २ मेकॅनिकल कम्पोस्टिंग प्रकल्पांमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी पाठविला जातो.

यासाठी कचऱ्याचे वर्गीकरण आवश्यक आहे, पण नागरिक वर्गीकरण करण्यास टाळाटाळ करीत आहेत, याबाबत अनेक सोसायट्यांना कचरा न उचलण्याचा इशाराही देण्यात आला आहे,' असे जगताप यांनी सांगितले.

अदृश्य प्रकल्पासाठी सवलत

ओला कचरा जिरविणे आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग केलेल्या सोसायट्या अथवा नागरिकांना महापालिकेतर्फे घरपट्टीत १० टक्के सवलत मिळते. याचा गैरफायदा घेऊन अनेक नागरिक प्रकल्प बंद पडलेला असूनही सवलती घेत असल्याचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी धडक मोहीम सुरू केली असून सवलती घेणाऱ्या नागरिकांच्या प्रकल्पांच्या पाहणीसाठी ते अचानक भेट देत आहेत, अशी माहिती सुरेश जगताप यांनी दिली.

### ६. आजपासून पुन्हा 'कचराकोंडी'?

पुणे वृत्तान्त, २१ डिसेंबर २०११, पुणे/ प्रतिनिधी

कचऱ्याच्या गाड्या अडविण्याचा उरुळी-फुरसुंगीच्या ग्रामस्थांचा निर्णय

उरूळी देवाची व फुरसुंगी येथील ग्रामस्थांना कचरा डेपोसंदर्भात महापालिका व शासनाने दिलेले कोणतेही आश्वासन न पाळल्याच्या निषेधार्थ आणि डेपो इतरत्र हटविण्याच्या प्रमुख मागणीसाठी बुधवारपासून (२१ डिसेंबर) बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानुसार डेपोमध्ये येणाऱ्या कचऱ्याच्या गाड्या अडविण्यात येणार आहेत. त्यामुळे या प्रश्नावरून शहरात पुन्हा एकदा 'कचराकोंडी' होण्याची भीती निर्माण झाली आहे.

कचरा डेपोचा त्रास उरुळी व फुरसुंगी ग्रामस्थांना होत असल्याने महापालिका व शासनाने विविध आश्वासने दिली होती. मात्र, येथील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, या गावांना शुद्ध पाण्याच्या पुरवठ्याच्या बाबतीत दिलेले आश्वासन पाळण्यात आलेले नाही. गेल्या वीस वर्षांपासून आमच्या गावांना कचरा समस्येशी झगडा द्यावा लागत आहे. 'नागरी घन कचरा नियम २०००' प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन होत नाही. या नियमानुसार कचरा मोकळ्या जागेत न टाकता कचऱ्याचे वर्गीकरण करून त्यावर प्रक्रिया करण्याची गरज आहे. त्यामुळे काही वर्षांनंतर कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आले. तरीही कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नाही. त्यामुळे मोकळ्या जागेत टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुरुगधी पसरण्याबरोबरच पाणीदेखिल दूषित झाले आहे. पावसाळ्यामध्ये दूषित पाणी वाहत येते. परिणामी गावकऱ्यांना अनेक प्रकारच्या आजारांचा सामना करावा लागतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २००४ सालात कचरा साठविण्यासाठी या गावांची निवड योग्य नाही, त्याबरोबरच शहराच्या चारही बाजूला कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभारण्याची सूचना महापालिकेला केलेली होती. शहरातल्या कचऱ्यावर शहरातच प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्याची सोय करता येत असली तरी या गावातच कचरा टाकला जात असल्याने गावकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. याबातीत शहरातल्या परिस्थितीत सुधारणा होईपर्यंत कचऱ्याची समस्या सुटणार नाही. महापालिकेने लवकरात लवकर उरूळी देवाची व फुरसुंगी या गावातून कचरा डेपो हटविण्यात

यावे, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे, असे कचरा डेपो हटाव संघर्ष समितीचे अध्यक्ष भगवान भाडळे आणि फुरसुंगी पर्यावरण संरक्षक समितीचे अध्यक्ष दिलीप मेहता यांनी दिली.

### ७. चर्चेतून तोडगा न निघाल्यामुळे उरुळी ग्रामस्थांचे आंदोलन सुरूच

पुणे/ प्रतिनिधी, २२ डिसेंबर २०१२
चर्चेतून कोणताही तोडगा न निघाल्यामुळे उरुळी देवाची आणि फुरसुंगीच्या ग्रामस्थांनी कचरा डेपो इतरत्र हटविण्याच्या मागणीसाठी सुरू केलेले 'कचराबंद आंदोलन' आज दुसऱ्या दिवशीही सुरू राहिले. या आंदोलनामुळे शहरातील बहुतांश कचरा आज उचलला गेला नाही. कचरा डेपो हटवा या मागणीसाठी कचरा डेपो हटाव संघर्ष समितीतर्फे कचरा गाडय़ा अडविण्याचे आंदोलन सुरू करण्यात आले असून महापौर मोहनसिंग राजपाल, आयुक्त महेश पाठक यांनी आजही ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. तसेच ग्रामस्थांचे प्रश्न सोडविले जातील. परंतु पुणेकरांना वेठीस धरू नका, अशी विनंतीही महापौरांनी केली. मात्र, चर्चेतून तोडगा निघू शकला नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी आज कचरा डेपोची पाहणी केली.
आंदोलनामुळे शहरातील बहुतांश कचरा आज उचलला गेला नाही. त्यामुळे अनेक ठिकाणचे कचऱ्याचे कंटेनर भरून वाहू लागले असून कचरा इतस्ततः पसरत आहे. कंटेनर भरून गेल्यामुळे कंटेनरच्या शेजारीच रस्त्यांवर किंवा पदपथांवर कचरा टाकला जात आहे. शनिवार पेठ, कसबा पेठ, शिवाजीनगर गावठाण, आपटे रस्ता, घोले रस्ता परिसर वगैरे भागातील कचऱ्याचे कंटेनर भरून गेले असून ते आज उचलले गेले नाहीत.
आंदोलकांबरोबर चर्चा करताना आयुक्तांनी कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या बाहेर साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येईल तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांप्रमाणे काम केले जाईल असे आश्वासन दिले. मात्र या आश्वासनाने आंदोलकांचे समाधान झाले नाही. शहरात घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रिया केली गेली, तर कचऱ्याची समस्या निर्माण होणार नाही. मात्र, महापालिकेशी संबंधित अधिकारी व नेते त्यासाठी कोणतीही पावले उचलण्यास तयार नाहीत, असा आरोप आंदोलकांनी यावेळी केला.
महापालिकेने हे आरोप अमान्य केले असून उरुळी कचरा डेपोसाठी तसेच तेथील गावांसाठी महापालिकेने गेल्या चार वर्षांत ४२ कोटी रुपये खर्च केल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. याशिवाय आणखी १२६ कोटींची कामे मार्गी लागली आहेत. गावांमधील पाणीपुरवठा, आवश्यकतेनुसार टँकर पुरवठा, टाकीचे बांधकाम, औषध फवारणी यासह अनेक कामे करण्यात आली असून इतरही कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### ८. कचरा प्रकल्पाला हवी जागा; कोणी देईल का?

Friday, December 09, 2011 सकाळ

पुणे - उरुळी देवाची येथील कचरा डेपोमुळे अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे आता जागा कोठे शोधायची, असा प्रश्न महापालिका प्रशासनाला पडला आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी शहराबाहेर जागा मिळू शकत नाही. दोन जागांकरिता राज्य सरकारकडे पैसे भरूनदेखील तेथील नागरिकांनी विरोध केल्याने या प्रकल्पांचे भवितव्य अंधारात गेले आहे. ई-कचरा, "मेडिकल वेस्ट' आणि बांधकाम क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी यंत्रणा सध्यातरी महापालिकेकडे नाही. पुढील काळात त्यावर उपाययोजना केल्या नाही, तर शहराला गंभीर प्रश्नाला सामोरे जावे लागेल.

रामटेकडी आणि कोथरूड येथील कचरा डेपो बंद केल्यानंतर उरुळी देवाची येथे कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू झाला. तेव्हापासून येथील नागरिक महापालिका, राज्य सरकारच्या विरोधात आंदोलन करीत आहे. कचरा प्रकल्प सुरू करताना महापालिकेने दिलेली वचने पाळली नाही, असा आरोप नागरिक आणि लोकप्रतिनिधी करीत आहेत. गेल्या तीन वर्षांत उरुळी देवाची, फुरसुंगी, भेकराईनगर भागात विकासकामे केली, या भागात टॅंकरने पाणी पुरवठा केला, दोन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू केल्याचा दावा महापालिका प्रशासन करीत आहे. या भागाला प्रामुख्याने भेडसावणारा प्रश्न पिण्याच्या पाण्याचा आहे. कचरा प्रकल्पामुळे भूगर्भातील पाणी दूषित झाले आहे. ते पिण्यायोग्य नसल्याने पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. सहा महिन्यांपूर्वी मंत्रालयात यासंदर्भात एक बैठक झाली होती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत या भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी 50 कोटी रुपयांची योजना राबविण्याचा निर्णय झाला; पण अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप शिवसेनेचे आमदार विजय शिवतारे यांनी केला आहे. ""प्रकल्पाला कॅपिंग करण्यासाठी 90 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. कचरा प्रकल्प सुरू करताना पूर्ण कॅपिंग करण्याचे ठरले होते. त्याची कार्यवाही महापालिकेने केली नाही. लिचेट वाहून जाण्याकरिता काहीच व्यवस्था नाही. या भागात विकासकामे करण्याचे मान्य केले होते, जी कामे झाली ती दर्जाहीन आहेत. काही कामे पूर्ण झालीच नाही. प्रकल्पाकरिता घेतलेली पण सध्या उपयोगात येत नसलेली जागाही मूळ जमीनमालकाला परत द्यायला हवी. गेल्या अठरा वर्षांपासून या भागात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याबाबत विधी मंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पुन्हा प्रश्न उपस्थित करणार आहोत,'' असेही शिवतारे यांनी सांगितले.

यंत्रणेवर ताण

दरम्यान, गेल्या तीन वर्षांत महापालिकेने या भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केल्याचा दावा प्रशासन करीत आहे. "कचऱ्याचे ओपन डंपिंग पूर्ण केले आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम सुरू आहे. कॅपिंग करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. दररोज शहरात तेराशे ते चौदाशे टन कचरा निर्माण होत आहे. दर वर्षी त्यामध्ये पाच टक्के वाढ होत आहे,' असे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. पाणी पुरवठा योजनेसाठी खर्चाचा दहा टक्के वाटा देण्यास महापालिका मुख्य सभेने मान्यता दिली आहे. तो प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वेगाने वाढत आहे. कचरा गोळा करणाऱ्या यंत्रणेवरही ताण येत आहे. कचरा वाहून नेण्यासाठी गाड्या पुरेशा संख्येने नाहीत. यातील अनेक वाहने जुनी झाल्याने, त्यांच्या देखभाल दुरुस्तीकडे अधिक लक्ष द्यावे लागत आहे. कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांकरिता जीपीएस ही यंत्रणा बसविण्याचा निर्णय झाला होता; पण अद्याप ती कार्यवाही पूर्ण झाली नाही. या विभागासाठी आवश्यक मनुष्यबळही उपलब्ध नाही, ते भरण्यासाठी राज्य सरकारकडून परवानगी मिळत नाही. एकीकडे कचऱ्याचे प्रमाण वाढत असताना, उरुळी देवाची येथील प्रकल्पासंदर्भात सुरू असलेली आंदोलने, यामुळे शहराच्या चार भागांत कचरा प्रकल्प सुरू करण्याचा प्रस्ताव पुढे आला होता. त्यानुसार तुळापूर-वढू , येवलेवाडी येथील जागा महापालिकेच्या ताब्यात आल्या. त्याचे पैसेही महापालिकेने दिले. दोन्ही ठिकाणी नागरिकांनी विरोध केल्याने कचरा प्रकल्प कार्यान्वित होऊ शकला नाही. त्यामुळे भविष्यकाळात कचराप्रकल्पाकरिता जागा मिळविणे हेच महापालिकेसमोर मोठे आव्हान असेल.

ई-कचऱ्याची समस्या गंभीर

दरम्यान, संगणक, मोबाईल यांसारखा ई-कचरा मोठ्या प्रमाणावर शहरात निर्माण होत आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने हा सर्वांत हानिकारक कचरा मानला जातो. जर्मनीतील एका संस्थेच्या मदतीने ई-कचऱ्याचा प्रकल्प येवलेवाडी येथे सुरू करण्याचा प्रस्ताव होता; पण तो आता मागे पडला आहे. आकडेवारीनुसार शहरात दर वर्षी अडीच हजार टन ई-कचरा निर्माण होत आहे. महापालिकेने या संदर्भात सर्वेक्षण केले आहे. बांधकामामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा नाही. हा कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे नदीपात्र, नाल्याजवळ हा राडारोडा टाकला जात आहे. रुग्णालयात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेला नियोजनपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहे.

http://www.esakal.com/esakal/20111209/5514270988653380428.htm

### ९. सफाईचा झाला 'कचरा'

21 Sep 2011, 0300 hrs IST मटा प्रतिनिधी, पुणे

शहरामध्ये कचरा गोळा करणाऱ्या पावणेसातशे गाड्यांपैकी शंभर गाड्यांसाठी ड्रायव्हर नसल्याने त्या गाड्यांचा वापरच होत नसल्याची माहिती महापालिकेच्या प्रशासनाने मंगळवारी दिली . विविध भागांमध्ये साठलेल्या कचऱ्याच्या मुद्द्यावरून सर्वपक्षीय नगरसेवकांनी मंगळवारी प्रशासनाला धारेवर धरले .

गेल्या काही दिवसांमध्ये शहराच्या विविध भागांत कचऱ्याचे ढीग साठत असल्याचे दिसून आले आहे . तसेच , अनेक भागांमध्ये कचरापेट्यांमधील कचरा कित्येकदिवस उचलला गेला नसल्याच्याही तक्रारी आहेत . त्या पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत प्रशासनाला धारेवर धरले . प्रशासन काहीच कारवाई करीत नसल्याने नगरसेवकांची बदनामी होत असल्याची टीका मेधा कुलकणीर् , दत्तोबा ससाणे , महादेव बाबर , पृथ्वीराज सुतार , सुनील बिबवे , अशोक येनपुरे , अनिल

शिरोळे , मुक्ता टिळक आणि उज्ज्वल केसकर यांनी केली . कचरा वर्गीकरणाचे , बायोगॅस प्लँट उभारण्याचे कामही गतीने होत नसल्याची टीका करण्यात आली . तेव्हा प्रशासनाच्या वतीने उपायुक्त सुरेश जगताप यांनी खुलासा केला .

गणेशोत्सव , दसरा - दिवाळी आणि पावसाळ्याच्या काळात कर्मचाऱ्यांची गैरहजेरी जाणवते . कचरा उचलण्यासाठी महापालिकेकडे ६७८ गाड्या आहेत . परंतु , त्यापैकी ११० गाड्यांवर ड्रायव्हरच नाहीत , त्यामुळे त्यांचा उपयोग होत नाही . तसेच , अन्य चालकांच्याही सुट्या - गैरहजेरीमुळे वीस ते पंचवीस टक्के गाड्यांचा वापर होत नाही , असे ते म्हणाले . दरम्यान , गेल्या दोन वर्षांत कचऱ्याच्या गाड्यांची खरेदी झालेली नाही . या गाड्या आठ ते दहा वर्षांत खराब होतात . ब्रेकडाऊनचे प्रमाण दहा टक्के आहे , असे ते म्हणाले .

## By 2025, city will generate 3500 tonne waste a day'

Neha Madaan Aug 30, 2011, 05.27am IST

PUNE: By 2025, solid waste generated in the city will touch the 3,500-tonne-per-day mark, approximately, according to a research published in an international journal this month. Researchers at the Mumbai-based S K Somaiya College have estimated this, along with quantifying solid waste generated in Pune, calculating it at 2,602.17 tonne per day. The research said households produce 76.28% of the total solid waste, followed by restaurants (16.72%), shops and commercial units (3.50%), hotels (2.47%), theatres (0.69%) and hospitals (0.33%).

Sanjay Rode, assistant professor, Somaiya College, who undertook the research on behalf of the Journal of Geography and Regional Planning, said, "Households generate 1,985.02 tonne of solid waste per day, including kitchen waste, vegetables, flowers, leaves, fruits, paper and bulbs. Theatres generate 17.87 tonnes, while hospitals produce about 8.65 tonne and hotels 64.32 tonne."

The research assumed that solid waste from household units will gradually rise due to the growth in population and number of units. "Commercial units, shops, restaurants and hotels will also rise as the population grows. Thus, we estimated that solid waste in the city will rise up to 3,500 tonne per day by 2025." said Rode.

Using the Tobit regression method, the research found that population growth is positively correlated with solid waste generation. "Population growth is creating more waste, resulting from a change in income, taste pattern and commodities' type. Therefore, it's positively co-related to the total solid waste. However, hospital waste is negatively co-related, as hospitals usually generate less solid waste. On the other hand, it is positively co-related to restaurants," said Rode. A positive correlation exists where if one variable increases, the increases as well and vice-versa.

Improper solid waste management causes all types of air, soil and water pollution, the research said. "Indiscriminate dumping of wastes contaminates surface and ground water supplies. Solid waste clogs drains and creates stagnant water for insect breeding. Insect and rodent vectors are attracted to this waste and can spread diseases such as cholera and dengue," he said.

The research, titled 'Integrated approach to solid waste management in Pune city', also suggests ways to tackle solid waste. "There is a need for scientific planning of solid waste collection at households, collection points and its transportation to the landfill sites. The PMC must involve private sectors in the processes. The private sector has money to invest in the necessary machinery," said Rode.

In addition, the PMC needs to keep an information system on population and waste created and stored, among other things. "The updated information will help plan an approach to handle solid waste. Waste collected should also be segregated into different types. Decomposition of dry waste is required at the ward level itself, as it will help reduce the cost of collection and transport," Rode said.

### १०. Trash trouble as collection goes haywire

Umesh Isalkar Sep 5, 2011, 01.55am IST
PUNE: The city, with its garbage collection system slowly falling apart, may have a crisis soon unless bold steps are taken to tackle the problem.

Garbage collection, affected by absenteeism of workers, waste collectors, rag-pickers and container drivers, and an increase in the volume during festivals, has gone haywire.

As much as 400 metric tonnes of refuse mostly from the fringe areas that is not cleared every day, is piling up. Except for the Peth and central areas of the city, garbage bins near Sassoon Hospital, Bibvewadi, Salunke Vihar, Warje, Sahakarnagar, Gokhalenagar and Vishrambaugwada are overflowing with trash.

For the last eight days, only 1,000 metric tonnes of garbage is being disposed of at Phursungi-Urali garbage depot. The city generates around 1,400 to 1,600 metric tonnes of garbage every day during the festival period.

"Going by the agreement with Phursungi-Urali villagers, the civic body can process only 1,000 metric tonne garbage at the landfill site. Since the last eight days, the villagers have categorically warned the civic body to bring only 1,000 metric tonne garbage to the site. Hence garbage has not been lifted for the last eight days as the civic body has no place to take it for disposal. The vermicomposting plants started in the city are not functioning at full capacity. This has aggravated the condition," a ward medical officer, requesting anonymity, said.

Another ward medical officer said preference was being given only to those areas where Ganapati mandals are concentrated in large numbers. "In the Peth areas, garbage is currently being lifted every day. Besides, all central areas are also getting adequate attention. But the fringe areas are suffering as there is no scope for garbage disposal. Hence garbage is lifted from these areas after seven to eight days and the pile up is huge."

However, Pramod Yadav, special officer in charge of waste disposal and processing at Pune Municipal Corporation, trashed this claim. "Due to rain in the last few days, garbage has been become heavy. Hence the processing plant at the garbage depot at Phursungi Urali is finding it difficult to process all of it. Besides, the generation of waste always increases during the festival period and this week had two festivals, Eid and Ganeshotsav. But garbage is being cleared everyday," he said.

At present, the processing plants and biogas units collectively help process up to 1,250 metric tonne, said Yadav, adding that the civic body has stopped open dumping at the depot in Urali Devachi since June.

"We no longer dump unprocessed and untreated garbage. We are finding it difficult to process the additional amount of waste. It has overburdened the city's waste processing capacity," said Yadav.

The collection process is also affected by absenteeism of workers, waste collectors, rag-pickers and container drivers to a certain extent, he added

However, citizens are fuming at the litter at almost every street corner made more of a mess by stray dogs and cattle that feed on them.

"Garbage is not being regularly lifted in our area for the past one month. We have to put up with the unbearable stench every time we pass by the bins near our colony. Mosquitoes and flies are an added nuisance," said Madhuri Athavale of Mukundnagar area.

Radiologist Meenakshi Gajbhiye, head of the radiology department at Sassoon Hospital, said, "Garbage bins surrounding the Sassoon Hospital and the area around its quarters are overflowing with trash. Stray dogs feast on rotting food. They are a menace when they chase people and vehicles. The stench is unbearable. Patients and their relatives have to bear the stench whenever they visit the hospital. The subway close to the Sassoon Hospital has all strewn around. It emits very bad smell. It becomes unberable whenever we have to use the subway."

A Salunke Vihar resident said the rotting garbage made her feel sick ."I can't stand being inside my home. I spend the whole day feeling sick and with a headache. The stench is hanging in the air at night too and I have to light incense to keep it away," she said.

Pundalik Mane, of Chaitnya Nagar in Katraj, was more graphic. "The garbage container is close to a public toilet that compounds the stench. Food stalls operate nearby which is abnoxious."

"Opening the windows has become a huge problem as the PMC's garbage container is placed close to our society. We have to brave the overwhelming stench while passing the container every time we enter or exit the building. Flies are an added problem," said Vinita Rathi, a resident of Kondhwa.

Medical experts have warned of a health problem if the garbage is not cleared. "The city must learn from Mumbai's recent brush with malaria. Address accumulated garbage in time and don't allow water to stagnate," said Sharad Agarkhedkar, ex-president of the city chapter of Indian Medical Association (IMA).

Piles of garbage attract insects and rodents. Rainwater gets trapped in the bins, around them and under the layers of plastic and at construction sites and in quarries. These then become ideal breeding grounds for diseases like malaria, dengue and chikungunya, he added.

"There are other hazards. Decaying garbage emits odour. Many materials that are dumped contain toxic or hazardous substances that could threaten water supply. First of all, there could be a nauseating feeling among those living close to an overflowing bin. Secondly, the number of mosquitoes and flies increase considerably and so do health issues," family physician Radheshyam Lahoti said.

Garbage is the ideal environment for rats, mice, other rodents, ticks, flies and mosquitoes and in many cases these transmit diseases to humans, said Devendra Shirole, former state president of IMA.